उपक्रम

# बसवंत गार्डनचे कार्य कृषिक्षेत्राला प्रेरणादायी : ना.डॉ. भारती पवार




'सेवर निसर्गोत्सवां'तर्गत आयोजित 'मिलांज फळांचा महाराजा' प्रदर्शनाच्या उद्घाटनपर भाषणात बोलताना केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री डॉ. भारती पवार. समवेत व्यासपीठावर श्री. भागवत बाबा बोरस्ते, तहसीलदार श्री. शरद घोरपडे, डॉ.श्री. भास्कर गायकवाड, श्री. संजय पवार, श्री. विजय पवार, डॉ.श्री. बी.बी. पवार, श्री. महेश पाटील, श्री. सुहास कदम आदी मान्यवर.

नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंतस्थित (ता.निफाड) बसवंत गार्डनला केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी गेल्या महिन्यात (दि. ९ मार्च) सदिच्छा भेट दिली. बाजारपेठेची बदलती गरज लक्षात घेऊन शेतमालाचे उत्पादन घेणे गरजेचे आहे, शेतकरी सधन व सक्षम होण्यासाठी सुरू असलेले 'बसवंत गार्डन'चे प्रयत्न गौरवास्पद तसेच प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन ना.डॉ. पवार यांनी यावेळी बोलताना केले.

'सेवर निसर्गोत्सवा'त आयोजित 'मिलांज फळांचा महाराजा' या प्रदर्शनाचे उद्घाटन आणि विजेत्यांच्या सत्कारप्रसंगी त्या बोलत होत्या. बसवंत गार्डनमध्ये शेतकरी, विद्यार्थी व हौशी नागरिकांना मधमाशीबाबत सचित्र माहिती मिळते. शालेय विद्यार्थ्यांनी शैक्षणिक सहलींच्या माध्यमातून व युवकांनी उद्योजकतेसाठी



'सेवर निसर्गोत्सवा'चा औपचारिक शुभारंभ...



कृषिप्रधान ग्रामसंस्कृतीचे प्रतीक असलेल्या बैलगाडीच्या प्रतिकृतीची ना.डॉ. भारती पवार यांना सहर्ष भेट...

प्रशिक्षण घेण्याच्या हेतूने या उद्यानास भेट द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

याप्रसंगी तहसीलदार श्री. शरद घोरपडे, श्री. विजय पवार, श्री. सुहास कदम, श्री. महेश पाटील, श्री. सुनील पाटील, भागवत बाबा बोरस्ते, सतीश मोरे, बापू पाटील आदी मान्यवरांसह शेकडो शेतकरी बांधव उपस्थित होते.

यावेळी ना.डॉ. पवार यांच्या हस्ते 'मिलांज फळांचा महाराजा' स्पर्धेतील विजेते शेतकरी तसेच बसवंत लँडस्केप आणि चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव करण्यात आला. भारतातील पहिला सुरेख तसेच सुसज्ज असा ॲपी टुरिझम प्रकल्प आपल्या नाशिक जिल्ह्यात साकारला असल्याबद्दल आनंद वाटतो; अधिकाधिक नागरिकांनी या केंद्रास भेट द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. निसर्ग जपला पाहिजे, कृषिक्रांती झाली पाहिजे. परागीभवनासाठी शेतकऱ्यांनी मधमाशीचा वापर केला तर कृषी उत्पादन दुप्पट मिळू शकते, याचे उत्तम प्रबोधन या केंद्रात केले जाते, म्हणून शेतकऱ्यांनी याचा लाभ घेतला पाहिजे. शेतीला जोड व्यवसाय म्हणून 'हनी बी क्लस्टर' स्थापन व्हायला हवेत. कांदा, द्राक्षांबरोबरच मधासाठीही नाशिकची ओळख व्हावी. भारतातील पहिले मधमाशी पालन - पर्यटन केंद्र म्हणून विकसित होण्याबरोबरच 'क्लस्टर ऑफ एक्सलेन्स' होण्याच्या दृष्टीनेही केंद्र सरकारच्या काही योजनांतून बसवंत गार्डनला नक्कीच मदत करण्याचा प्रयत्न करेन, असे आश्वासन देखील त्यांनी दिले. या बरोबरच कृषी आणि संलग्न क्षेत्राला 'हेल्दी सोल्युशन्स' देणारे असे विविध प्रकल्प निर्माण झाले पाहिजेत, अशी अपेक्षाही ना.डॉ. पवार यांनी व्यक्त केली.

कृषी संस्कृतीचे जतन होण्यातील मधमाशी या कीटकाचे अमूल्य योगदान लक्षात घेऊन, तिचे संवर्धन व संरक्षण करण्याविषयीचे प्रबोधन या केंद्रात प्रामुख्याने केले जाते, अशी माहिती 'पूर्वा केमटेक' आणि 'ग्रीनझोन ॲग्रोकेम'चे कार्यकारी संचालक श्री. संजय पवार यांनी दिली.

फळपीक स्पर्धेत **मिलांज द्राक्ष महाराजा (हिरवा गट)** : श्री. राजवर्धन नंदकिशोर मोहिते, (वडनेर भैरव, ता. चांदवड, नाशिक), **मिलांज द्राक्ष महाराजा (रंगीत गट)** : श्री. तेजस बोरस्ते (साकोरे मिग, निफाड, नाशिक), **मिलांज डाळिंब महाराजा** : श्री. विकास बाळू डुकरे (जवळा, ता. सांगोला, जि. सोलापूर), **मिलांज बनाना किंग**: श्री. प्रतीक विजय पवार (निळवंडे, ता. संगमनेर, जि. अहमदनगर), **मिलांज पपया किंग** : श्री. शेखर पाटील (लिखारे, ता. शहादा, जि. नंदुरबार) तर **मिलांज चिक्कू महाराजा** पुरस्कार श्री. सागर रंगनाथ दवंगे (पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद) हे विजेते ठरले.

या बक्षिसांसोबतच प्रत्येक फळाच्या गटात प्रथम, द्वितीय, तृतीय तसेच प्रत्येक गटात पाच उत्तेजनार्थ पारितोषिके जाहीर करण्यात आली. परीक्षक म्हणून ज्येष्ठ कृषितज्ज्ञ डॉ. बी.बी. पवार, डॉ. भास्कर गायकवाड, श्री. दिलीप जगताप यांनी काम पाहिले. स्पर्धेत राज्यभरातील शंभराहून अधिक फळ उत्पादक शेतकऱ्यांनी आपला सहभाग नोंदवला. दि. ९ ते १२ मार्चपर्यंत बसवंत गार्डन, मुखेड रोड, पिंपळगांव बसवंत येथे आयोजिलेल्या या फळ प्रदर्शनाची मुदत उत्तम प्रतिसादामुळे पुढे दोन दिवस वाढविण्यात आली होती, सर्वांना प्रवेश विनामूल्य होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. रुपेश ठाकरे यांनी केले.

**(सौजन्य: पूर्वा कृषिदूत परिवार)**



**'मिलांज फळांचा महाराजा' स्पर्धेतील पारितोषिकांची क्रमवारी ठरविल्यानंतर ना.डॉ. भारती पवार यांच्या समवेत श्री. संदीप सोनवणे, डॉ.श्री. भास्कर गायकवाड, श्री. महेश पाटील, डॉ.श्री. बी.बी. पवार, श्री. संजय पवार, श्री. सुहास कदम, श्री. सुनील पाटील, श्री. नीलेश भामरे, श्री. संदीप वाघ आदी मान्यवर.**




**'बीनिव्हर्स'ची पाठराखण : फळपीक स्पर्धेतील पारितोषिकप्राप्त शेतकरी आणि चित्रकला स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांसह मान्यवर...**

**दखल**

## 'बसवंत गार्डन'चा तामिळनाडूतही गौरव

तामिळनाडूतील उटीमध्ये गेल्या महिन्यात 'इंडियन रिस्पॉन्सिबल टुरिझम समिट'चे आयोजन करण्यात आले होते. पर्यावरण संरक्षणाची-संवर्धनाची दृष्टी बाळगून; त्याचप्रमाणे या माध्यमातून लोकजागृतीची भूमिका घेऊन कार्यरत असलेल्या पर्यटन केंद्रांचा या संमेलनात विविध पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला. नाशिकस्थित पिंपळगाव बसवंत, ता. निफाड येथील 'बसवंत गार्डन ॲपी-टुरिझम सेंटर' देखील या गौरवाचे मानकरी ठरले. सृष्टीच्या नैसर्गिक संरचनेची जपणूक करणारे (इको फ्रॅजाईल) प्रकल्प सर्वांच्या प्रशंसेचे धनी होते. या संदर्भातील विशेष पुरस्कार तामिळनाडूचे पर्यटनमंत्री श्री. के. रामचंद्रन यांच्या हस्ते स्वीकारताना 'पूर्वा केमटेक' व 'ग्रीनझोन ॲग्रोकेम'चे कार्यकारी संचालक तसेच बसवंत गार्डनचे कल्पक प्रणेते श्री. संजय पवार.



## ‘मिलांज द्राक्ष महाराजा पुरस्कारा’चे मानकरी

| | | |
|---|---|---|
| **मिलांज द्राक्ष महाराजा (हिरवा गट)**<br>**हिरवा (गोल)** | **श्री. राजवर्धन नंदकिशोर मोहिते** | वडनेर भैरव, ता. चांदवड, जि. नाशिक |
| प्रथम<br>द्वितीय<br>तृतीय | श्री सुरेश रामभाऊ पानसरे<br>श्री अजय कणसे<br>श्री. संजय वामनराव गवळी | उंबरखेड, ता. निफाड, जि. नाशिक<br>राजुरी, ता. जुन्नर, जि. पुणे<br>खडक माळेगाव, ता. चांदवड, जि. नाशिक |
| **हिरवा (लांब)**<br>प्रथम<br>द्वितीय<br>तृतीय | <br>श्री. रविकिरण सोपानराव नळे<br>श्री. विनोद डुंबरे<br>श्री. राजेंद्र बाबुराव मौने | <br>दह्याने, ता. चांदवड, जि. नाशिक<br>राजुरी, ता. जुन्नर, जि. पुणे<br>सोनी, ता. मिरज, जि. सांगली |
| **मिलांज द्राक्ष महाराजा (रंगीत गट)**<br>द्राक्ष काळा (गोल) | **श्री. तेजस बोरस्ते** | साकोरे मिग, ता. निफाड, जि. नाशिक |
| प्रथम<br>द्वितीय<br>तृतीय | श्री. बाळासाहेब परशराम शिंदे<br>श्री. श्रीकांत वायकर<br>श्री. संकेत साहेबराव कावळे | उंबरखेड, ता. निफाड, जि. नाशिक<br>गुंजाळवाडी, ता. जुन्नर, जि. पुणे<br>बोपेगाव, ता. दिंडोरी, जि. नाशिक |
| **द्राक्ष काळा (लांब)**<br>प्रथम<br>द्वितीय<br>तृतीय | <br>श्री. सुधीर पंढरीनाथ जाधव<br>श्री. सारंग नानासाहेब काळे<br>श्री. महेंद्र सोलार | <br>सोनी, ता. मिरज, जि. सांगली<br>नान्नज, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर<br>गुंजाळवाडी, ता. जुन्नर, जि. पुणे |
| **द्राक्ष फ्लेम सीडलेस**<br>प्रथम<br>द्वितीय<br>तृतीय | <br>श्री. मनोज अशोकराव बोरस्ते<br>श्री. गणेश रामकृष्ण आथरे<br>श्री. रामप्रताप शिरसाठ | <br>साकोरे मिग, ता. निफाड, जि. नाशिक<br>उंबरखेड, ता. निफाड, जि. नाशिक<br>बहादुरी, ता. चांदवड, जि. नाशिक |
| **द्राक्ष क्रिमसन**<br>प्रथम<br>द्वितीय<br>तृतीय | <br>सौ. मीरा डुंबरे<br>श्री. मंगेश डोके<br>श्री. शैलेश संजय मोरे | <br>राजुरी, ता. जुन्नर , जि. पुणे<br>गोळेगाव, ता. जुन्नर, जि. पुणे<br>पिंपळगाव (ब.), ता. निफाड, जि. नाशिक |
| **द्राक्ष नवीन जाती**<br>उत्तेजनार्थ<br>उत्तेजनार्थ<br>उत्तेजनार्थ<br>उत्तेजनार्थ<br>उत्तेजनार्थ | <br>श्री. रमेश खंडेराव वाघ<br>श्री. योगेश पिंगळे<br>श्री. सुरेश मधुकर लहितकर<br>श्री. राजेंद्र दौलतराव भालेराव<br>श्री. श्रीमंत दत्तू गवळी | <br>पिंपळगाव (ब.), ता. निफाड, जि. नाशिक<br>दरी, ता. नाशिक, जि. नाशिक<br>खेडगाव, ता. दिंडोरी, जि. नाशिक<br>वडनेर भैरव, ता. चांदवड, जि. नाशिक<br>संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहमदनगर |

# इतर फळपिकांच्या 'मिलांज महाराजा पुरस्कारा'चे मानकरी

| | | |
|---|---|---|
| **मिलांज डाळिंब महाराजा** | **श्री. विकास बाळू डुकरे** | जवळा, ता. सांगोला, जि. सोलापूर |
| प्रथम | श्री. भागवत उत्तम पवार | तामशिदवाडी, ता. माळशिरस, जि. सोलापूर |
| द्वितीय | श्री. विजय मरगळे | तडवळे, ता. आटपाडी, जि. सांगली |
| तृतीय | श्री. उमेश काशीराम अहिरे | पिंपळगांव, ता. मालेगाव, जि. नाशिक |
| उत्तेजनार्थ | श्री. विश्वास धुडकू बोरसे | नळकेस, ता. सटाणा, जि. नाशिक |
| उत्तेजनार्थ | श्री. दादाजी धर्मा भामरे | फोफिर, ता. सटाणा, जि.नाशिक |
| उत्तेजनार्थ | श्री. नीलेश अर्जुन ठाकरे | राहुड, ता. सटाणा, जि.नाशिक |
| उत्तेजनार्थ | श्री. सुनील विलास जाधव | पांढरेवाडी, ता. आटपाडी, जि. सांगली |
| उत्तेजनार्थ | श्री. भीमराव बाळू श्रीराम | जवळा, ता. सांगोला, जि. सोलापूर |
| **मिलांज बनाना किंग** | **श्री. प्रतीक विजय पवार** | निळवंडे, ता. संगमनेर, जि. अहमदनगर |
| प्रथम | श्री. मछिंद्र गंभीर चौधरी | वभळाव, ता. शिरपूर जि. धुळे |
| द्वितीय | श्री. दिलीप हिरालाल पाटील | तावसे, ता. चोपडा, जि. जळगाव |
| तृतीय | श्री. दिलीप महाजन | नगरदेवळा, ता. पाचोरा, जि. जळगाव |
| उत्तेजनार्थ | श्री. संदीप दगडू चौधरी | वड्री ता. यावल, जि. जळगाव |
| उत्तेजनार्थ | श्री. मनोज ओंकार पाटील | तारडी, ता. शिरपूर, जि. धुळे |
| उत्तेजनार्थ | श्री. भीमराव सूर्यवंशी | रोकडे, ता. भडगाव, जि. जळगाव |
| उत्तेजनार्थ | श्री. रजनीकांत प्रताप पाटील | तारडी, ता. शिरपूर, जि. धुळे |
| **मिलांज पपया किंग** | **श्री. शेखर पाटील** | लिखारे, ता. शहादा, जि. नंदुरबार |
| प्रथम | श्री. पितांबर एलजी पाटील | फागणे, ता. धुळे, जि. धुळे |
| द्वितीय | श्री. प्रतीक राहुल गाडेकर | बोरबन, ता. संगमनेर, जि. अहमदनगर |
| तृतीय | श्री. परीक्षित देवरे | अस्टाने, ता. साक्री, जि. धुळे |
| **मिलांज चिक्कू महाराजा** | **श्री. सागर रंगनाथ दवंगे** | मिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद |
| प्रथम | श्री. प्रशांत प्रदीप बरक | चिंचली, ता. डहाणू, जि. पालघर |
| द्वितीय | स्नेहल अनंतराव पोतदार | आंबेवाडी, ता. डहाणू, जि. पालघर |
| तृतीय | संग्राम सदाशिव वर्तक | वरार- नवतलाव, ता. डहाणू, जि. पालघर |

## छत्रपती संभाजीनगर येथील मिलांज महाराजा' पुरस्काराचे विजेते

| | | |
|---|---|---|
| **मिलांज संत्रा किंग** | **श्री. पवन चोपडे** | कारंजा, जि. वर्धा |
| प्रथम<br>द्वितीय<br>तृतीय | श्री. हरी विजय बारंगे<br>श्री. कोपीरामजी भगवान मुले<br>श्री. प्रवीण वाघमारे | माणिकवाडा, ता. कारंजा, जि. वर्धा<br>भुर्ती, काटोल, जि. नागपूर<br>सत्तरपूर, ता. आर्वी, जि. वर्धा |
| **मिलांज मोसंबी क्विन** | **श्री. नाथा भाऊसाहेब गोडसे** | खेडगांव, ता. अंबड, जि. जालना |
| प्रथम<br><br>द्वितीय<br>तृतीय | श्री. लहू रामराव गवळी<br><br>श्री. आप्पा काशिनाथ दौंड<br>श्री. आसाराम उबरसिंग गोमलाडू | माळीकडगाव, ता. गंगापूर,<br>जि. छ. संभाजीनगर<br>शिंदी, ता. चाळीसगाव, जि. जळगाव<br>टाकळी, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर |
| **मिलांज स्ट्रॉबेरी क्वीन** | **श्री. विष्णू भिलारे** | |
| प्रथम<br>द्वितीय<br>तृतीय | श्री. आकाश भिलारे<br>श्री. लक्ष्मण सीताराम गावित<br>श्री. गणपत हिरामण भोये | अवकाळी, ता. महाबळेश्वर, जि. सातारा<br>शिंदे, ता. सुरगाणा, जि. नाशिक<br>हरणटेकडी, ता. सुरगाणा, जि. नाशिक |
| **मिलांज बोरांचा महाराजा** | **श्री. संदीप नामदेव पवार** | पुणदगांव, ता. नेवासा, जि. अ.नगर |
| प्रथम<br>द्वितीय<br>तृतीय | श्री. सुकदेव नाना करद<br>श्री. श्रीकांत भगवान निकम<br>श्री. प्रदीप सर्जेराव ढेपले | पिंपळगांव, ता. राहता, जि. अ. नगर<br>माळेवाडी, नाशिक<br>शिवना, ता. सिल्लोड, जि. छ. संभाजीनगर |
| **मिलांज सीताफळ महाराजा** | **श्री. मंजितराव गिताराम तुपे** | नरला, ता. फुलंब्री, जि. छ. संभाजीनगर |
| प्रथम<br>द्वितीय<br>तृतीय | श्री. अरुण भाऊसाहेब पवार<br>श्री. रावसाहेब दत्तू कदम,<br>श्री. सुभाष आप्पाराव हिवडे | चापानेर, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर<br>बदनापूर, ता.जि. जालना<br>खिर्डी, ता. खुलताबाद,<br>जि. छ. संभाजीनगर |
| **मिलांज चिकू महाराजा** | **श्री. गणेश आनंदा गिडगे** | प्रिंप्री लौकी, ता. राहता, जि. अ.नगर |
| प्रथम<br>द्वितीय<br>तृतीय | श्री. ओमप्रकाश अशोक दिघे<br>श्री. एस.एम. फार्म<br>श्री. जर्नादन दवंगे, | लोणी, ता. संगमनेर, जि. अ.नगर<br>डहाणू, ता.जि. पालघर<br>पिशोर, ता. कन्नड, |